स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञान विद्या शाखा अंतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी.

डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांच्या प्राचीन भारताच्या इतिहास लेखनाचे विश्लेषनात्मक अध्ययन

* संशोधक *
हेमंत सोपानराव इंगळे

* मार्गदर्शक *
डॉ. राहुल वरवंटीकर
संशोधन मार्गदर्शक तथा
इतिहास विभाग प्रमुख,
प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड.

* संशोधन केंद्र *
पानसरे महाविद्यालय, अर्जापूर
ता.बिलोली जि. नांदेड.

1) प्रस्तावना :-

प्राचीन भारताचा इतिहासाचा अनेक इतिहासकारांनी इतिहास लेखन केले आहे प्राप्त व उपलब्ध साधनाच्या आधारे व तत्कालीन असलेल्या विमर्श आधारे इतिहासाचे लेखन केले आहे राज्य करणाऱ्या ब्रिटिशांचा व युरोपियनांचा प्रभाव ही मोठ्या प्रमाणात आहे पाश्चिमात्य अभ्यासक वारंवार म्हणतात की प्राचीन भारतात इतिहास लेखन नव्हते व हिंदूंना इतिहास विषयक दृष्टिकोन नव्हता त्यामुळे त्यांनी येथील निर्मिती ऐतिहासिक रचनांना अविश्वसनीय निकालात काढले भारतावर नंतरच्या काळात झालेल्या परकीय आक्रमणामुळे आपल्या आपल्या प्राचीन व मध्ययुगाच्या सुरुवातीच्या काळचा तपशीलवार इतिहास उपलब्ध नाही हेही खरंच आहे या सर्वांचा परिणाम म्हणून आपल्या प्राचीन भारताच्या इतिहासात अनेक इतिहासकारांनी आपणास तफावत ही आढळते पाश्चात त्यांना येथील संस्कृत भाषेचे असलेले अपूर्ण ज्ञान हेही या मागचं प्रमुख कारण असल्याचे लक्षात येते यामुळेच भारतीय इतिहास व संस्कृतीचा यथार्थ अभ्यास लेखक डॉ.श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांनी आपल्या 18 खंडातून केला आहे. त्यांच्या प्राचीन भारतीय इतिहास लेखनाचे विश्लेषण करणे व त्यांच्या इतिहास लेखनातून भारतीय इतिहासाच्या प्रतिपादनाला मिळणाऱ्या नव्या दिशा अभ्यासणे हा या संशोधन प्रबंधाचा हेतू आहे.

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील अंकोली च्या एका शेतकरी कुटुंबात 25 जानेवारी 1917 रोजी डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांचा जन्म झाला सोलापूरच्या हरीभाई देवकरण प्रशालेत त्यांचे शिक्षण झाले, त्याच शाळेतून त्यांनी अकरावी परीक्षेत महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक मिळविला. पुढे मुंबई विद्यापीठातून (तत्कालीन बॉम्बे युनिव्हर्सिटी) संस्कृत विषय घेऊन बी.ए.ची पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली. 1940 ला हायस्कूल शिक्षक म्हणून करिअरची सुरुवात त्यांनी केली. 1947 महाराष्ट्र शासनाच्या

विक्रीकर सेवेत प्रथमवर्ग अधिकारी म्हणून दाखल झाल्यावर त्यांनी अर्थशास्रात नैपुण्य संपादन केले. त्यांनी 1953 साली 'लोकशाहीचा अर्थव्यवहार' हा शासकीय अंदाजपत्रकावरील ग्रंथ प्रसिद्ध केला. 1957 ला 'वैभवाचे अर्थशास्त्र' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. यास 1958 चा राज्य पुरस्कारही प्राप्त झाला आहे. 1957 ला 'सर्वसंग्राहक गीता' हा गीतेवरील विवरणात्मक ग्रंथ प्रकाशित केला. 1963 मध्ये 'कल्पवन' ही योजनाबद्ध अर्थविकासावरील कादंबरी लिहिली आहे. 1983 मध्ये 'नवल उदेला चंडाशु' हा आद्य शंकराचार्यांच्या चरित्रावरील संशोधनात्मक ग्रंथ प्रसिद्ध केला. आद्य शंकराचार्यांचा इ.स. 788 हा सध्याचा प्रचलित काळ खरा नसून, तो इ.स.पू. 509 असा आहे हे त्यांनी प्रतिपादित केले आहे. यावरूनच पुढे सत्य कथन व वाजवी दृष्टिकोन अंगीकारून 18 खंडात्मक भारतीय इतिहास व संस्कृतीचा यथार्थ अभ्यास या शीर्षकाखाली इंग्रजी व मराठी या भाषांमधून लिहिण्याची भव्य भीष्म योजना त्यांच्या संपादकत्वाखाली कार्यान्वित झाली. समाजातील विविध स्तरातील अनेक मान्यवर विद्वानांनी हा प्रकल्प राष्ट्रीय महत्त्वाचा व आंतरराष्ट्रीय लौकिकाचा असल्याचे सांगून त्याचा मोठा गौरव केला आहे. भारतीय इतिहास व संस्कृतीचा प्रारंभ काळ, पुराणे-इतिहास व संस्कृती, महाकाव्य -रामायण व महाभारत महापर्व, तमिळींचा इतिहास व अंधारलेले क्षितिज, इस्लाम शी संघर्ष, हिंदू वर्चस्वाचा लढा, युरोपियन पर्व, धर्माचा मुलाधार -वेद ,भारतीय स्वातंत्र्याचा उदय, अद्वितीय कर्मयोगी -आद्य शंकराचार्य, ब्रह्मण सुखे मोहरला झरा, भारत शाश्वत संस्कृतीची यक्ष भूमी, कला विज्ञान आणि तंत्र विकास, संगीत नृत्य व नाट्य, भारतीयांचा विश्वसंचार, भारतीय अर्थनीतीचा इतिहास, आणि भारताचे आवाहन. असे 18 खंड डॉ.श्रीपाद कुलकर्णी यांनी सिद्धीस नेले.

डॉ. श्रीपाद कुलकर्णी यांनी आपल्या इतिहास लेखनात वैदिक काळापासून प्राचीन भारताच्या इतिहासाची मांडणी केली आहे. त्यासोबत त्यांनी, मध्ययुगीन भारताचा व

आधुनिक भारताचा इतिहासही आपल्या 18 खंडातून मांडला आहे. प्राचीन भारताच्या इतिहासाच्या संदर्भाने लेखकाने आपली भूमिका मांडताना, भारतीय सभ्यता ज्यात धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार 'पुरुषार्थ' आदर्श रूप मानले आहे. भारतीय संस्कृतीची व जीवनाची धर्म, दर्शन, नीतिशास्त्र, साहित्य, पुराणे, समाजव्यवस्था, स्थापत्य व अन्य कला ही सर्व अंगे केवळ काही विशिष्ट व्यक्तीवर अवलंबून नसून या पुरुषार्थांवर अवलंबून आहे. हिंदूंच्या इतिहास विषयक धारणेत प्रसंग व त्यात भाग घेणाऱ्या व्यक्ती यापेक्षा मानव जातीचे आदर्श व तत्संबंधी सिद्धांत यांना अधिक महत्त्व होते. इतिहासाचा प्रमुख उद्देश व्यक्तीच्या सर्वांगीण उन्नतीला प्रेरणा देणे हा आहे. भूतकाळाच्या अशा अध्ययनाने वर्तमान समयी आपण कोणत्या स्तरावर आहोत व भविष्यात आपले काय कर्तव्य आहे याचेही योग्य ते मूल्यांकन या अध्ययनाने होऊ शकते. भारताने भूतकाळात जगाला गणित, विज्ञान, कृषी वैद्यक अशा विद्या विकसित करून दिल्या आहेत, अनेक ग्रंथ, काव्य या माध्यमातून येथील दर्शन ही जगाला दिले आहे. याशिवाय स्थापत्य मूर्ती लेणी या कलाही भारताच्या श्रेष्ठत्वात भर घालतात. त्यामुळेच भारताचा इतिहास स्वतः भारताच्या दृष्टीने व जगाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. अशा इतिहासाच्या अध्ययनाने भारतीय अस्मितेची आत्मविश्वासयुक्त जाणीव जागृती होऊन भविष्यासाठी मार्गदर्शन प्राप्त होईल या दृष्टीने लेखकाने केलेल्या प्राचीन भारताच्या इतिहासाचे अध्ययन करणे महत्त्वपूर्ण व आवश्यक आहे.

2) विषय निवडीचा उद्देश:-

भारताच्या इतिहासाचा अभ्यास करत असताना, विशेषतः प्राचीन भारताच्या इतिहासासंबंधी प्रामुख्याने-भारतीय कालगणना यासंबंधीची मांडणी, अशोकाचे शिलालेख तसेच सरस्वती सिंधू संस्कृती यावर पाश्चात्यांनी आपल्या सोयीप्रमाणे व आकलनाप्रमाणे

मांडणी केल्याचे लेखकाच्या लक्षात आल्याने लेखकाने अभ्यासपूर्ण मांडणी यामध्ये केली आहे. तसेच प्राचीन विश्व संस्कृतीचा वेद हा झरा आहे. याचा सखोल व बुद्धिवादी दृष्टिकोनातून अभ्यास लेखकाने केला आहे. याचबरोबर लोहयुगाचा आरंभ इ.स.पू.1000 मध्ये झाला हा पाश्चात्य विचारवंतांनी मांडलेला युक्तिवादही लेखकाने आपल्या लिखाणातून भ्रामक ठरवला आहे. एकूणच प्राचीन भारताच्या इतिहासात लेखकाच्या अशा योगदानाचे विश्लेषणात्मक अध्ययन करण्यासाठी प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडण्यात आला आहे.

3) संशोधनाची व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधनात डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांच्या इतिहास लेखनाचे विश्लेषणात्मक अध्ययनाचा आढावा घेण्यात आला आहे. भारतीय इतिहास व संस्कृतीचा यथार्थ अभ्यास या शीर्षकाखाली लेखकाने लिहिलेल्या इतिहासाचे विश्लेषणात्मक अध्ययन करणे एवढाच संशोधन अभ्यास येथे अपेक्षित आहे. तेवढ्यापुरती संशोधनाची व्याप्ती मर्यादित आहे.

4) संशोधनाची पद्धती :-

प्रस्तुत संशोधन विषयासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करून द्वितीय स्त्रोतांमधून माहितीचे संकलन करून विश्लेषण केले जाईल. त्याच प्रमाणे प्राचीन भारताचा इतिहास वरील विविध ग्रंथ, पुस्तके, नियतकालिके, वर्तमानपत्रे व इंटरनेटच्या माध्यमातून माहितीचे संकलन केले जाईल. संकलित केलेल्या माहितीच्या आधारे चिकित्सक पद्धतीने अभ्यास करून प्रस्तुत संशोधन केले जाईल. लेखकाच्या प्राचीन भारताच्या इतिहास लेखनाचा विश्लेषणात्मक आढावा घेऊन निष्कर्ष स्थापित करण्यात येतील.

5) विषयाचे महत्त्व :-

डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांनी प्राचीन व आधुनिक भारतीय इतिहास लेखन नव्या दृष्टिकोनातून केले आहे. त्यांनी आपल्या इतिहास लेखनातून अनेक इतिहासकारांचे दावे प्रति दावे खोडून काढले आहेत. भारतीय इतिहासात आज मान्यताप्राप्त घटना प्रसंग व कालगणना याची पूर्व ऐतिहासिक नोंदी घेत मिमांसा केली आहे. त्याचबरोबर सांस्कृतिक इतिहास आणि त्याविषयीच्या मान्यतांना नवीन दृष्टिकोन किंवा नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे. या मांडणीमुळे नवीन संशोधक व अभ्यासकांना भारतीय इतिहासाकडे पाहण्याचा नवीन दृष्टिकोन प्राप्त झालेला आहे. या दृष्टिकोनाचा इतिहास अवलोकनासाठी व इतिहासाची पुनर्बांधणी करण्यासाठी उपयोग होईल यात शंकाच नाही. यामुळे प्रस्तुत संशोधकाने निवडलेल्या संशोधनाचे महत्त्व अधोरेखित होते.

6) संशोधनाचे उद्दिष्टे :-

1. डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांच्या जीवन चरित्राचा व कार्याचा आलेख प्रस्तुत करणे.
2. डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांच्या इतिहास विषयक साहित्याचा परिचय देणे.
3. डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांच्या प्राचीन भारतीय कालगणने संदर्भातील योगदानाचे अध्ययन करणे.
4. डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांच्या प्राचीन भारतीय राजकीय, सामाजिक इतिहास संशोधनातील योगदानाचा चिकित्सक अभ्यास करणे.
5. डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी प्राचीन भारतीय साहित्य अध्ययनाला केलेल्या योगदानाचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे.
6. डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांच्या इतिहास संशोधनातून प्राप्त होऊ शकणार प्राचीन भारतीय इतिहासाच्या फेरमांडणीच्या शक्यता अभ्यासणे.

7) गृहितके :

1. डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांच्या इतिहास संशोधनातून प्राचीन भारतीय इतिहासातील कालगणनेच्या संदर्भात नवे आयाम प्राप्त होतात.
2. डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांच्या इतिहास संशोधनातून प्राचीन भारतीय राजकीय इतिहासाच्या मांडणीला नव्या दिशा प्राप्त होतात.
3. डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांच्या इतिहास संशोधनातून प्राचीन भारतीय साहित्याची नवीन मीमांसा करणे शक्य होते.
4. डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांच्या इतिहास संशोधनातून प्राचीन भारतीय सामाजिक व्यवस्था व नीतिमूल्ये यांचे नवे अर्थ स्पष्ट होतात.
5 डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुतकर्णी यांच्या इतिहास संशोधनाच्या प्रकाशात प्राचीन भारतीय इतिहासाची फेरमांडणी आवश्यक ठरते.

8) प्रकरणांची रचना :-

प्रस्तुत संशोधन प्रबंध हा सात प्रकरणात विभागला असून प्रबंधाच्या आकरणासाठी त्यातील असे प्रकरण निहाय वर्णन थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल.

1) प्रस्तावना :-

या प्रकरणामध्ये विषयाची ओळख करून देत असतानाच भारताच्या इतिहासाच्या संबंधी श्रीपाद कुलकर्णी यांनी प्राचीन भारतीय इतिहास लेखन विश्वाचा आणि जीवनाचा उगम व विकास वैदिकांचे निवासस्थान भेदातील इतिहास याचबरोबर भारतीय कालगणना सरस्वती सिंधू सभ्यता व भारतीय संस्कृतीची काही अन्य वैशिष्ट्ये या माध्यमातून इतिहासाच्या नव्या दिशांची ओळख आपणास करून दिली आहे. त्याचा आढावा आपण या प्रकरणात घेणार आहोत.

2) **साहित्याचे पुनर्विलोकन:-**

डॉ. श्रीपाद कुलकर्णी यांच्या इतिहासाच्या साहित्याच्या विश्लेषणात्मक अध्ययनाच्या अनुषंगाने येणाऱ्या विषयासंबंधी जे साहित्य ऐतिहासिक ग्रंथ चरित्र आणि त्या अनुषंगाने निर्माण झालेल्या साहित्याचा सखोल अभ्यास आपण या प्रकरणात करणार आहोत

3) **डॉ. श्रीपाद कुलकर्णी यांचे जीवनचरित्र:-**

डॉ. श्रीपाद कुलकर्णी यांच्या इतिहास लेखनाचे विश्लेषणात्मक अध्ययन या विषयावर संशोधन प्रबंध असल्यामुळे त्यांचे जीवन चरित्र अभ्यासणे क्रमप्राप्त होते. त्यांच्या जीवनचरित्राचा थोडक्यात आढावा घेणे, त्यांचे इतिहासातील योगदान विशद करणे व त्यांनी साहित्य क्षेत्रात लेखनाच्या माध्यमातून केलेल्या योगदानाचा आढावा या प्रकरणात घेतल्या जाईल.

4) **डॉ. श्रीपाद कुलकर्णी यांच्या इतिहास संशोधन स्वरूप व व्याप्ती:-**

लेखकाने इतिहासासंबंधी निर्माण केलेल्या साहित्याचे स्वरूप व त्याची व्याप्ती याचा आढावा व त्याचा सविस्तर अभ्यास आपण या प्रकरणात करणार आहोत.

5) **डॉ. श्रीपाद कुलकर्णी यांच्या इतिहासलेखनाचे विश्लेषणात्मक अध्ययन:-**

लेखकाने केलेल्या लिखाणाचा विश्लेषणात्मक अभ्यास या प्रकरणात करून लेखकाने आपल्या इतिहासाच्या लेखनातून भारतीय इतिहासाला मिळणाऱ्या नव्या दिशा व मिमांसा याचे विश्लेषण या प्रकरणात करण्यात येईल.

6) **उपसंहार :-**

यामध्ये सर्व प्रकरणांची मांडणी करण्यात येईल गृहीतकाची पडताळणी विश्लेषणाच्या आधारे करण्यात येईल व शेवटी उद्दिष्टानुसार हाती आलेले निष्कर्ष गृहीतकाच्या आधारे पडताळणी करून त्या निष्कर्षाचा आढावा घेण्यात येईल.

7) **आधारभूत संदर्भ ग्रंथ**

1) श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, 'भारतीय इतिहास व संस्कृती प्रारंभकाळ', श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, भीष्म, मुंबई, 1992.

2) श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, 'पुराणे-इतिहास व संस्कृती कोश', श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, भीष्म, मुंबई, 1993.

3) श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, 'महाकाव्य- रामायण आणि महाभारत', श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, भीष्म, मुंबई, 1994.

4) श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, 'महापर्व-स्वायंभूव मनू ते शकारि शालिवाहन', श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, भीष्म, मुंबई, 1997.

5) श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, 'तामिळींचा इतिहास आणि अंधारलेले क्षितिज', श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, भीष्म, मुंबई, 1997.

6) श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, 'इस्लाम शी संघर्ष', श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, भीष्म, मुंबई, 1993.

7) श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, 'हिंदू वर्चस्वासाठी लढा', श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, भीष्म, मुंबई, 1993.

8) श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, 'युरोपियन पर्व', श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, भीष्म, मुंबई, 1994.

9) श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, 'धर्माचे मुलाधार- वेद', श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, भीष्म, मुंबई, 1999.

10) श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, 'भारतीय स्वातंत्र्याचा उदय', श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, भीष्म, मुंबई, 1996.

11) श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, 'अद्वितीय कर्मयोगी-श्री आद्य शंकराचार्य', श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, भीष्म, मुंबई, 1992.

12) श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, 'ब्रह्मन्-सुखे मोहरला झरा', श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, भीष्म, मुंबई, 1994.

13) श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, 'भारत- शाश्वत संस्कृतीची यक्षभूमी', श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, भीष्म, मुंबई, 1999.

14) श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, 'विज्ञान व प्रायोगिक इतिहास', श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, भीष्म, मुंबई, 1998.

15) श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, 'संगीत नृत्य व नाट्य', श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, भीष्म, मुंबई, 1998.

16) श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, 'भारतीयांचा विश्वसंचार', श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, भीष्म, मुंबई, 1996.

17) श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, 'भारतीय अर्थनीतीचा इतिहास', श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, भीष्म, मुंबई, 1999.

18) श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी, 'भारताचे आवाहन', श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर, भीष्म, मुंबई, 1998.

संदर्भ ग्रंथ:-

1) देव प्रभाकर, 'इतिहास एक शास्त्र', कल्पना प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती 2002.

2) डुरांट वीर, 'भारतीय संस्कृती', पाप्युलर प्रकाशन, पूणे,

3) डांगे श्रीपाद अमृत, 'आदी भारत प्राचीन भारतीय इतिहासाची सत्य दर्शन', इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सोशालिस्ट स्टडीज मुंबई, पहिली आवृत्ती 1969.

4) गायधनी र.ना., 'प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, सातवी आवृत्ती 1970.

5) केशेट्टीवार के.एम., 'मध्ययुगीन भारत', श्रीराम बुक डेपो नागपूर, द्वितीय आवृत्ती 1971.

6) कोळवी विश्वास गोरखनाथ, 'इतिहास म्हणजे काय इतिहास लेखनातील बदलते प्रवाह', अथर्व पब्लिकेशन, धुळे, प्रथम आवृत्ती 2021.

7) काळबांडे आनंदा, 'इतिहासातील संशोधन पद्धती', प्रशांत पब्लिकेशन जळगाव प्रथम आवृत्ती 2020.

8) कौशिक संपूर्णानंद, 'प्राचीन एवं व्रहत भारत एक संक्षिप्त परिचय', नवदीप पॉकेट बुक्स दिल्ली, पहिली आवृत्ती 2012.

9) मोरवंचीकर रा.श्री., 'प्राचीन भारत', पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, प्रथम आवृत्ती 1990.

10) राव वसंत दीनानाथ, 'प्राचीन भारताचा इतिहास आणि संस्कृती', सोमय्या पब्लिकेशन प्रायव्हेट लिमिटेड मुंबई, द्वितीय आवृत्ती 1968.

11) सातभाई श्रीनिवास, 'इतिहास लेखन शास्त्र', विद्या बुक्स पब्लिशर औरंगाबाद प्रथम आवृत्ती 2015.

12) शेट्टीवार आचार्य के., 'प्राचीन भारताचा सांस्कृतिक व राजकीय इतिहास', विद्या प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती 1963.

संशोधक

हेमंत सोपानराव इंगळे

प्राचार्य

श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय (स्वतंत्र)

बारड ता. मुदखेड जि. नांदेड

मार्गदर्शक

डॉ. राहुल वरवंटीकर

संशोधन मार्गदर्शक तथा

इतिहास विभाग प्रमुख

प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड